# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

मुख्य कार्यालय भाईंदर, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/ ४१४१/२०१८-१९ दिनांक:- २४/१०/२०१८

Bhd. (Legal) 1809

## // भाग भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. बी.ए.सी. प्लॅनर्स अॅन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. (सल्लागार अभियंता)
जी/1, प्रथमेश अपार्टमेंट, डिकुना स्ट्रिट, भाईंदर (प.).

2) मे. गुजरात रिअलटर्सचे भागीदार श्री. गोपालजी के. व्दिवेदी (विकासक)
शॉप नं. 6, रचना अपार्टमेंट, एमसीएफ जॉगर्सपार्कच्या मागे,
लक्ष्मी नारायण मंदिर रोड, एकसार, बोरीवली (प.), मुंबई 400 092

विषय :- मौजे नवघर, स.क्र. 223/2बी, 226/3 (जुना), 191/2बी, 29/3 (नविन) या जागेतील इमारत प्रकार अे (सल्लागार अभियंता प्रस्तावित - भार्गव) (तळ + 4) साठी मंजूर नकाशाप्रमाणे भोगवटा दाखला मिळणेबाबत

संदर्भ :- 1) मे. बी.ए.सी. प्लॅनर्स अॅन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. (सल्लागार अभियंता) यांचा दि.10/09/2018 रोजीचा प्रस्ताव.

2) मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील क्र. यु.एल.सी./टिए/टे-4/भाईंदर/एसआर-1485+292, दि.19/03/2007 अन्वयेचे आदेश तसेच 10(3),10(5) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.300/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेले दि.27/09/2018 रोजीचे शपथपत्र व बंधपत्र.

3) मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र क्र. महसूल/क-1/टे-2/ नवघर/ सनद/एसआर-18/2018, दि.10/08/2018 व पत्र क्र. महसूल/क-1/टे-2/कावि-F-1519724348386, दि.16/07/2017 अन्वये अकृषिक आदेश.

4) मिरा भाईंदर महानगरपालिका पत्र क्र. मनपा/नर/2836/2014-15, दि.05/01/2015 अन्वये बांधकाम परवानगी.

5) मे. बी.ए.सी. प्लॅनर्स अॅन्ड इंजिनिअर्स प्रा.लि. यांचेकडील दि.09/08/2017 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

6) मे. बी.एच. राठोड यांनी दि.29/08/2018 रोजीचा इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्यतेबाबतचा (Structural Stability Certificate) दाखला.

7) श्री. श्रीनिवास बी. रेड्डी यांचा दि.08/03/2017 रोजीचा प्लंबींग बाबतचा दाखला.

8) उद्यान व वृक्ष प्राधिकरणाकडील पत्र क्र. मनपा/वृप्रा/मिरारोड/388/2017-18, दि.26/09/2017 अन्वयेचा दाखला.

11) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पत्र क्र. मनपा/साबां/4487/2018-19, दि.23/08/2018 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम कार्यान्वीत केल्याबाबतचा दाखला.

12) पाणीपुरवठा विभागाकडील रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे जा. क्र. मनपा/पापु/793/2018-19, दि.21/08/2018 अन्वयेचे प्रमाणपत्र.

13) विकासकाचे दि.30/08/2018 रोजीचे शपथपत्र.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

दिनांकः- २१/१०/२०१८

जा.क्र. मनपा/नर/ २१४८/२०१८-१९

Bhd. (Legal) 1809

महोदय,

विषयांकित जागेमधील **मौजे नवघर, स.क्र. 223/2बी, 226/3 (जुना), 191/2बी, 29/3 (नविन)** या जागेतील **रहिवास** वापराची इमारत प्रकार अे **(सल्लागार अभियंता प्रस्तावित - भार्गव) (तळ + 4)** एकूण क्षेत्र 804.43 चौ.मी. चे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे **सल्लागार अभियंता मे. बि.ए.सी.प्लॅनर्स ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि (नोंदणी क्र. नपा/नर/172/935/99-2000, दि. 06/05/99 व दि.31/12/2018 पर्यंतची मुदतवाढ)** यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता **मे. बी.एच. राठोड** व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक **श्री. श्रीनिवास बी. रेड्डी** यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **वरीलप्रमाणे** साठी खालील अटीशर्तींच्या अधिन राहुन इमारतीसाठी नकाशाप्रमाणे मंजूर भाग भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

**अटीशर्ती -**

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तींचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 13 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.
2) जर
   अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.
   ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.
3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.
4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.
5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.
6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.
7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.
8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.30/08/2018 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.
9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.
10) संदर्भिय पत्र क्र. 13 मधील हमीपत्रांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.
11) रेखांकनामधील वाहनतळाची जागा जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
२१/१०/१८

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक
2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका